<u>सं.फौ.ख.क्र. १६५/२०२१</u>
शासन वि. अवधुत
**<u>नि. क्र. १३ सोबत</u>**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ चा पुरावा शपथेवर सुरु</u>**

मी, याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो/करते की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | **संजय सुभाषराव गिरी,** |
| वय | – | ४७ वर्षे, |
| व्यवसाय | – | मजुरी, |
| राहणार | – | गणेशपुर, ता. आष्टी, जि. वर्धा. |

---------------------------------------

**<u>सरतपास, सरकारपक्षातर्फे, सरकारी वकिल श्री. व्ही. जी. पराते, यांच्यामार्फत सुरुः–</u>**

दिनांक ०६/०२/२०२१ रोजी पोलिसांनी मला पंचनामा करीता कुठेही बोलविले नाही. त्यांनी माझ्या समक्ष कुठलीही कार्यवाही केली नाही व काहीही जप्त केले नाही. आता मला पंचनामा दाखविला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहित नाही. त्यास **<u>नि.क्र.१४</u>** देण्यात येते.

<u>सदर साक्षदाराला फिर्याद मधील मजकूर आठवत नसल्यामुळे व तो त्याच्या पुर्व बयाणाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षदाराला सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात येते.</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी पोलिसांनी मला पंचनाम्या करीता मौजा गौरखेडा येथे आरोपीच्या घरी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पंच व पोलीस आरोपीच्या घरी गेलो असता आरोपी घरी मिळून आला, त्याचे नावे विचारले असता अवधुत संपंतराव कठाणे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घर झडतीत २५ लि. गावठी मोहा दारु मिळून आली. हे म्हणणे खरे नाही की, मिळालेल्या मुददेमला पैकी १८० मि.ली. चा नमुना रासायनीक परिक्षणाकरीता वेगळा काढून सिलबंद केला. उर्वरित दारु मोक्यावर नाश केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तेव्हा पंचनामा तयार केला व त्यावर मी वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**संफौ.ख.क्र. १६५/२०२१**
शासन वि. अवधुत
**नि. क्र. १३ सोबत**

**सरतपास पुर्ण.**
**आरोपी तर्फे स्वतः नाकारले.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

स्वा/-

ठिकाण : आष्टी
दिनांक – ०४/०८/२०२६

(प्रियंका अं. पटेल)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
आष्टी,जिल्हा – वर्धा